03-03-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/02/2025 11:51 PM Page 1



## निवडक




### आमोणकर विद्यामंदिरात विज्ञान दिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २ :** विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतुहल निर्माण करण्यासाठी तसेच त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी राष्ट्रीय दिनानिमित्त जी.एस. आमोणकर विद्यामंदिरात विज्ञान दिन साजरा करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ .पूजा दळवी व उपमुख्याध्यापिकास झेना व्हियेगस यांच्या हस्ते सी. वी. रमण यांच्या फोटोला पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात झाली. शिक्षिका श्रीमती मोहिनी हळर्णकर, विद्यार्थी रीतिक केरकर व शुभ गावस यांची समर्पक भाषणे झाली. शिक्षिका श्रीमती मोहिनी हळर्णकर यांनी आपल्या भाषणात सी. व्ही. रमण यांचे जीवन व वैज्ञानिक क्षेत्रात त्यांच्या योगदानाबद्दल सांगितले. विद्यार्थी श्रेयश कोरगावकर याने मोनोलॉग केले. आरव हळर्णकर, वृष्टी नाईक व समा शिंगेटी या विद्यार्थ्यांनी पावर पॉइंट सादरीकरण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गीत प्रस्तुत केले. पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरुषी बोलके व आशीर्वाद प्रियोळकर या विद्यार्थ्यांनी केले.

---



**म्हापसा :** विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रयोग, प्रदर्शनी करण्यात दंग असलेले जी.एस् आमोणकर विद्यामंदिराचे भावी वैज्ञानिक.

### आमोणकर विद्यामंदिरात विज्ञान दिन साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २ :** विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतुहल निर्माण करण्यासाठी तसेच त्यांच्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवण्यासाठी राष्ट्रीय दिनानिमित्त जी.एस आमोणकर विद्यामंदिरात विज्ञान दिन साजरा करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका पूजा दळवी व उपमुख्याध्यापिकास झेना व्हियेगस यांच्या हस्ते सी. व्ही. रमण यांच्या फोटोला पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात झाली. शिक्षिका श्रीमती मोहिनी हळर्णकर, विद्यार्थी रीतिक केरकर व शुभ गावस यांची समर्पक भाषणे झाली. शिक्षिका श्रीमती मोहिनी हळर्णकर यांनी आपल्या भाषणात सी. व्ही. रमण यांचे जीवन व वैज्ञानिक क्षेत्रात त्यांच्या योगदानाबद्दल सांगितले. विद्यार्थी श्रेयश कोरगावकर याने मोनोलॉग केले. आरव हळर्णकर, वृष्टी नाईक व समा शिंगेटी या विद्यार्थ्यांनी पावर पॉईंट सादरीकरण केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गीत प्रस्तुत केले. पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरुषी बोलके व आशीर्वाद प्रियोळकर या विद्यार्थ्यांनी केले.

---

### दिल्लीने बंगळुरूचा ९ गडी राखून केला पराभव

**दिल्ली, दि. २ :** महिला प्रीमियर लीग सीझन–३ च्या १४ व्या सामन्यात, दिल्ली कॅपिटल्स ने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा ९ गडी राखून पराभव केला. गतविजेत्या आरसीबीचा हा सलग चौथा पराभव आहे. संघाने फक्त २ सामने जिंकले आहेत. शनिवारी दिल्लीने बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. आरसीबीने ५ विकेट गमावल्यानंतर १४७ धावा केल्या. दिल्लीने १५.३ षटकांत फक्त १ गडी गमावून लक्ष्य गाठले. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करणाऱ्या आरसीबीने दुसऱ्याच षटकात कर्णधार स्मृती मंधानाची विकेट गमावली. तिला फक्त ९ धावा करता आल्या. त्यानंतर डॅनी वायट–हॉजने २१ धावा काढून संघाचे अर्धशतक पूर्ण केले. तिच्या पाठोपाठ राघवी बिश्तने एलिस पेरीसोबत ६६ धावांची भागीदारी केली. राघवीने ३२ चेंडूत ३३ धावा केल्या. तिच्यासमोर, ॲलिस पेरीने अर्धशतक झळकावले. तिने ६० धावा केल्या आणि संघाला १४७ धावांपर्यंत पोहोचवले. रिचा घोषने ५, कनिका आहुजाने २ आणि जॉर्जिया वेअरहॅमने १२ धावा केल्या. दिल्लीकडून शिखा पांडे आणि एन चरणी यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या. मॅरिझॅन कॅपनेही १ विकेट घेतली. १४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीने तिसऱ्या षटकात कर्णधार मेग लॅनिंगची विकेट गमावली. लॅनिंगने १२ चेंडूत २ धावा केल्या. त्यानंतर शेफाली वर्माने जेस जोनासेनसोबत शतकी भागीदारी करून संघाला १५.३ षटकांत विजय मिळवून दिला.शेफालीने ४३ चेंडूत ८० धावा आणि जेस जोनासेनने ३८ चेंडूत ६१ धावा केल्या. शेफालीने ८ चौकार आणि ४ षटकार मारले. तर जेसने ९ चौकार आणि १ षटकार मारला. आरसीबीकडून रेणुका सिंग ठाकूरने एकमेव विकेट घेतली. ७ सामन्यांमधील ५व्या विजयानंतर, दिल्ली कॅपिटल्सने सलग तिसऱ्या हंगामात प्लेऑफमध्ये प्रवेश केला. मुंबई ३ विजयांसह दुसऱ्या स्थानावर आहे. ४–४ गुणांसह, यूपी तिसऱ्या, बंगळुरू चौथ्या आणि गुजरात पाचव्या स्थानावर आहे.

# भारताचा न्यूझीलंडवर नेत्रदीपक विजय!

## उपांत्य फेरीत भारत - ऑस्ट्रेलियाशी तर दक्षिण आफ्रिका - न्यूझीलंडशी भिडणार

**दुबई, दि. २ :**

श्रेयस अय्यरची ७९ धावांची खेळी, वरूण चक्रवर्तीचे ५ विकेट्स व फिरकीपटूंची भेदक गोलंदाजी या जोरावर भारताने न्यूझीलंडला नमवत ४४ धावांनी मोठा विजय नोंदवला. भारताच्या फिरकीपटू चौकडीने ९ विकेट्स घेत किवीच्या धावांना वेसण घातलं. या विजयासह भारताने गुणतालिकेत पहिलं स्थान गाठलं आहे. टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीत गट टप्प्यातील तिन्ही सामने जिंकत उपांत्य फेरीत पोहोचला आहे. यासह भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीतील उपांत्य फेरीचा सामना ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळवला जाणार आहे.




दुबई इंटरनॅशनल स्टेडियमवर रविवारी २ मार्च रोजी खेळल्या गेलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या शेवटच्या गट सामन्याकडे सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या. उपांत्य फेरीतील ४ संघ आधीच ठरले होते पण आता कोणता संघ कोणत्या संघाविरूद्ध खेळणार हे निश्चित होणं बाकी होत आणि ते भारत–न्यूझीलंड सामन्याच्या निकालावर ठरणार होते. यासह आता उपांत्य फेरीचे संघ ठरले असून भारत वि. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड वि. दक्षिण आफ्रिका हे संघ असणार आहेत.

भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीतील तिसरी नाणेफेक गमावली पण सलग तिसरा सामना मात्र जिंकला आहे. नाणेफेक गमावत भारतीय संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला होता आणि भारताची सुरूवात खूपच खराब झाली. भारताने ३० धावांमध्ये ३ विकेट गमावले होते. यानंतर श्रेयस अय्यरने अक्षर पटेलच्या साथीने ९८ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. श्रेयस अय्यरने ७९ धावांची तर अक्षर पटेलने ४२ धावांची खेळी केली. न्यूझीलंडकरून वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीने ५ विकेट्स घेत भारताला जास्त धावा करण्याची संधी दिली नाही.

भारताने दिलेले २५० धावांचे लक्ष्य न्यूझीलंड सहज गाठेल असं वाटत होते. पण भारताने मोठी खेळी करत ४ फिरकीपटू खेळवले आणि किवी संघ फिरकीसमोर फेल ठरले. न्यूझीलंडचा फक्त केन विल्यमसन १२० चेंडूत ७ चौकारांसह ८१ धावा करत बाद झालाय याशिवाय कोणताही फलंदाज ३० धावांचा टप्पा गाठू शकला नाही. भारताच्या फिरकी गोलंदाजांनी किवी संघाला एकेका धावेसाठी मेहनत करायला लावली. अखेरीस भारताने न्यूझीलंडला सर्वबाद करत मोठा विजय नोंदवला.

भारताकडून वरूण चक्रवर्तीने १० षटकांत ४२ धावा देत ५ विकेट्स घेतल्या. तर अक्षर, जडेजा, हार्दिकने प्रत्येकी १–१ विकेट तर कुलदीपने २ विकेट्स घेतल्या. आपला पहिला चॅम्पियन्स ट्रॉफी सामना खेळत असलेल्या वरूणने भेदक गोलंदाजी करत सामनावीराचा पुरस्कारही पटकावला.

---

## आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम डिचोलीतच व्हावे

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २ :** ग्रामीण भागात क्रिकेटला उत्तेजन देण्यासाठी अनेक सुविधा उपलब्ध करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम डिचोली भागातच व्हावे (वन डिचोली) यासाठी माझा पहिलीपासून प्रयत्न असून वारंवार त्यासाठी आपण पाठपुरावा केलेला आहे. यापुढे त्यासाठी आपण विशेष उत्सुकता दाखवलेली असून निश्चितपणे स्टेडियम डिचोली भागात उभारण्यासाठी आमचा प्रयत्न आहे, असे क्रीडामंत्री गोविंद गावडे यांनी सांगितले. डिचोली येथे महोत्सवानिमित्त आलेल्या क्रीडामंत्री गोविंद गावडे यांना पत्रकारांनी विचारले असता त्यांनी या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली.

बीसीसीआयच्या समितीवर रोहन देसाई यांची निवड होणे हे गोव्याच्या क्रिकेट विश्वासाठी महत्त्वाची घटना असून आपण त्यांचे विशेष अभिनंदन



करत असल्याचे गोविंद गावडे यांनी सांगितले.

रोहन देसाई यांनी क्रिकेटसाठी मोठे योगदान दिलेले आहे, त्यामुळे बीसीसीआयच्या मार्फत गोव्याच्या क्रिकेटला नवी दिशा देण्यासाठी त्यांचे विशेष प्रयत्न उपयुक्त ठरणार आहेत. ग्रामीण भागात क्रीडा प्रतिभा मोठ्या प्रमाणात आहे. मात्र त्यांना चालना देण्यासाठी विशेष प्रयत्नकरणे सुविधा उपलब्ध करणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने आधुनिक सुविधा उपलब्ध होणे ही

**▶ क्रीडामंत्री गोविंद गावडे : बीसीसीआयच्या समितीवर रोहन देसाई यांची निवड**

आमची धारण आहे, त्यासाठी गेल्या अनेक वर्ष प्रयत्न करीत असून राज्यातील अनेक भागात क्रीडा सुविधा बहाल करण्यात सरकारला यश आलेले आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम डिचोली भागातच व्हावे. यासाठी आपण गेले अनेक वर्षे विधानसभा व इतर माध्यमातून वारंवार उल्लेख केलेला आहे. बीसीसीआयचे मुख्य सहकार्य लाभत असल्याने निश्चितपणे डिचोली (वन ) ग्रामीण भागात हे स्टेडियम उभारण्याचा आमचा संकल्प असून या प्रस्तावाला नक्कीच मान्यता मिळेल असा विश्वास क्रीडामंत्री गोविंद गावडे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

## गुळेली सरकारी माध्यमिक विद्यालयात विज्ञान दिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**गुळेली, दि. २ :** गुळेली सरकारी माध्यमिक विद्यालयात विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम मुख्याध्यापक सूरज नाईक यांच्या हस्ते विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक सूरज नाईक, ज्येष्ठ शिक्षिका अपर्णा सावईकर, शिक्षक प्रेमानंद च्यारी, अनिल प्रभू, सी. व्ही. रमण यांच्या भूमिकेत तन्मय वांतेकर उपस्थित होते.

शिक्षक अनिल प्रभू म्हणाले की, विज्ञानाचा आपल्या जीवनात उपयोग व ते ओळखून त्यावर अभ्यास करणे, देशाच्या प्रगतीला हातभार लावणे हे विद्यार्थी म्हणून आपले कर्तव्य आहे, असे विचार मांडले.

विज्ञान शिक्षिका अपर्णा सावईकर म्हणाल्या की विद्यार्थ्यांना निरीक्षण वृत्ती, आत्मविश्वास, मनातील प्रश्नांची




उत्तरे शोधणे अशा प्रवृत्ती जोपासण्यात याव्यात असे सांगितले.

सी. व्ही. रमण यांच्या भूमिकेत तन्मय वांतेकर याने रमण यांच्या विज्ञान क्षेत्रातील योगदानावर विचार मांडले. हर्ष गावकर व अर्पिता गावडे यांनी विज्ञान आपल्या जीवनात कसे आढळते ह्याची उदाहरणे दिली.

अक्षय, कुणाल, युतिक्षा, हर्षदश्र, स्वरूप, कैवल्य, निश्चल, नितीशा, संयुक्ता यांनी विविध वैज्ञानिक प्रकल्पातून विज्ञान दाखविले. विद्यार्थ्यांनी यावेळी विज्ञान गीत सादर केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिमरन व आभार प्रदर्शन सानिका गावस हिने केले. कार्यक्रमाचे नियोजन शिक्षिका अपर्णा सावईकर, चेतना शिरोडकर व अक्षता हळदणकर यांनी केले.

---

# आरोग्य सदृढ राहण्यासाठी योग्य आहार, व्यायाम महत्त्वाचे

## नगराध्यक्षा सारा देसाई : काणकोण ज्येष्ठ नागरिक मंचाचा क्रीडा मेळावा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २ :** ज्येष्ठ नागरिक भलेही आपल्या सेवेतून निवृत्त झाले असतील, मात्र आपले काम संपलेले नाही. आपल्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा युवा तसेच अन्य गरजूंना करून द्यावा. अशा क्रीडा मेळाव्यात भाग घेतल्यामुळे त्याचा फायदा होईल. आपले आरोग्य सदृढ राहण्यास योग्य आहार, खेळ व व्यायाम खूप महत्वाचा आहे, असे प्रतिपादन नगराध्यक्षा सारा देसाई यांनी केले.

काणकोण जेष्ठ नागरिक मंचातर्फे काणकोण मधील ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित काणकोण तालुका पातळीवर क्रिडा मेळावा उत्साहात झाला. यावेळी नगराध्यक्षा सारा देसाई उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तर नगरसेवक रमाकांत नाईक गावकर, लोकमान्य बँकेच्या व्यवस्थापिका आदिता जग्गी सन्माननीय अतिथी तसेच मंचाचे अध्यक्ष गिल्हेर्म मार्टिन्स, संयुक्त सचिव अनिल भगत, खजिनदार मधुकर देसाई व निमंत्रक दिलखुश शेट व्यासपीठावर उपस्थित होते.

सुरुवातीला अध्यक्ष गिल्हेर्म मार्टिन्स यांनी प्रमुख पाहुणे व अन्य मान्यवरांची ओळख व स्वागत केले. भारती




फळदेसाई, अरुणा देसाई, सुनंदा देसाई व सुनंदा नाईक देसाई यानी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

नगरसेवक रमाकांत नाईक गावकर यानी संघातर्फे होत असलेल्या कार्यक्रमाचे कौतुक केले. नवीन पालिका इमारतीत जागा देण्याबाबत केलेल्या मागणी वर येत्या बैठकीत सकारात्मक निर्णय घेईल असे सांगून जवळच असलेल्या बल्कांवची दुरुस्ती काम करणार त्यामुळे त्याचा जेष्ठांना फायदा होईल. असे आपल्या भाषणात सांगितले. यावेळी आदिता जग्गी यांनीही लोकमान्य बँक जेष्ठ नागरिकाकरता राबवत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

ह्या क्रिडा मेळाव्यात ६० ते ६४वर्षे, ६५ ते ६९ वर्षे आणि ७० वर्षावरील वयोगट अशा तीन गटात ही स्पर्धा झाली. या मेळाव्यात काणकोण मधील जेष्ठ नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी झालेले होते.

हा मेळावा खुल्या प्रकारात घेण्यात आला होता. सहभागी ज्येष्ठ विजेत्यांना आकर्षक चषक, पदक आणि प्रमाणपत्र मान्यवरांहस्ते देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलखचश शेट तर अनील फळदेसाई यानी आभार व्यक्त केले.

हा मेळावा चावडीवरील सरकारी कार्यालय संकुलाजवळील गायतोंडे मैदानावर सकाळी ८.३० वाजल्यापासून सुरू झाला. काणकोण नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष आणि चावडी प्रभागाचे विद्यमान नगरसेवक रमाकांत नाईक गावकर यांनी हा मेळावा पुरस्कृत केला होता.

---

# प्रायॉरिटी टायटन्स–मडगाव रॉयल्स यांच्यात ‘एलिमिनेटर २’

## सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स अंतिम फेरीत

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २ :** गोवा जीएसबी स्पोर्टस् अँड चॅरिटेबल ट्रस्ट यांनी गोवा सारस्वत समाज यांच्या सहकार्याने मडगावच्या एमसीसी मैदानावर आयोजित केलेल्या आल्कॉन जीएसबी युनिटी कप टी–२० क्रिकेट स्पर्धेत शनिवारी क्वॉलिफायर १ सामन्यात सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्सने प्रायॉरिटी टायटन्सचा सुपर ओव्हर’मध्ये पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. ‘एलिमिनेटर’ लढतीत मडगाव रॉयल्सने काणकोण मठग्राम युनायटेडचा ८ गडी राखून पराभव करत एलिमिनेटर २’ लढतीत स्थान प्राप्त केले. क्वॉलिफायर १’ स्पर्धेत पराभूत झालेला प्रायॉरिटी टायटन्स व ‘एलिमिनेटर’ सामन्याचा विजेता मडगाव रॉयल्स यांच्यात २ मार्च रोजी




‘एलिमिनेटर २’ लढत होईल. या सामन्याचा विजेता ८ मार्च रोजी विद्युतझोतात होणाऱ्या अंतिम फेरीत लढतीत सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स संघाशी विजेतेपदासाठी झुंजणार आहे.

सकाळच्या सत्रात झालेल्या ‘क्वॉलिफायर १’ लढतीत प्रायॉरिटी टायटन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारली. सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्सने १९.५ षटकांत सर्वबाद १२९ अशी धावसंख्या उभारली. यानंतर प्रायॉरिटी टायटन्सने २० षटकांत ९ बाद १२९ धावा केल्या. विजेता ठरविण्यासाठी सुपर ओव्हरचा वापर करावा लागला. टायटन्सने एका षटकांत १ बाद ९ धावा केल्या. सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्सने ४ चेंडूंत ११ धावा करत विजय मिळविला.

दुपारच्या सत्रातील एलिमिनेटर’ सामना एकतर्फी झाला. प्रथम फलंदाजी करताना काणकोण मठग्राम युनायटेडला २० षटकांत ९ गडी गमावून केवळ १३५ धावा करता आल्या. मडगाव रॉयल्सने केवळ १३.५ षटकांत २ गडी गमावून १३७ धावा करत सहज विजय साध्य केला.

**संक्षिप्त धावफलक.**

सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स – १९.५ षटकांत सर्वबाद १२९ (आदित्य प्रभुगावकर नाबाद ३२, अनिमेश प्रभुगावकर २३, संदीप दलाल १९, सिद्धार्थ घाणेकर १४–२, स्मितेश दिवेकर २७–२, मनीष काकोडे ३६–२, विक्रांत प्रभू १५–१, कपिल सिनाय बोरकर १८–१, प्रणव बिचे १९–१) बरोबरी वि. प्रायॉरिटी टायटन्स – २० षटकांत ९ बाद १२९ (कपिल सिनाय बोरकर ३९, प्रणव बिचे २२, सिद्धार्थ घाणेकर २१, अनिमेश प्रभुगावकर १४–३, अनीश प्रभुदेसाई १९–३, अमोद बोरकर २२–१, यश प्रभुगावकर १६–१).

सुपर ओव्हर – प्रायॉरिटी टायटन्स – १ षटकांत १ बाद ९ (प्रणव बिचे नाबाद १, समर दुभाषी ८, अनिमेश प्रभुगावकर ९–१) पराभूत वि. सीडी मडगाव मेगा स्ट्रायकर्स – ०.४ चेंडूंत १ बाद ११ (यश प्रभुगावकर नाबाद ६, दुर्गेश प्रभुगावकर ०, सिद्धेश प्रभू अळवेकर नाबाद ४, सिद्धार्थ घाणेकर १०–१).

काणकोण मठग्राम युनायटेड – २० षटकांत ९ बाद १३५ (विराज पुराणिक ३२, सुमिरन आमोणकर २९, कौंतेय शेणवी १३, आदित्य दलाल १९–३, कौशल हट्टंगडी १५–२, संप्रभ फळदेसाई २५–१) पराभूत वि. मडगाव रॉयल्स – १३.५ षटकांत २ बाद १३७ (सनत प्रभुदेसाई नाबाद ३८, दामोदर पै पाटणेकर ३७, आदित्य दलाल ३०, साहीश महांबरे नाबाद २६, कृष्णकांत हेगडे देसाई २१–१).

## सिद्धार्थ बांदोडकर उच्च माध्य. विद्यालयाची ए.सी.जी.एल.मध्ये शैक्षणिक सहल




■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २ :** सिद्धार्थ बांदोदकर उच्च माध्यमिक विद्यालय वेळगेच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या अकरावी वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी विद्यालयातर्फे होंडा–सत्तरी येथील गोवा ऑटोमोबाईल कॉर्पोरेशन लिमिटेड (ए.सी.जी.एल.) मध्ये शैक्षणिक सहलीचे आयोजन केले.येथील बस निर्मिती प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना देण्यासाठी या सहलीचे आयोजन केले होते.

ए.सी.जी.एल. कंपनीचे वरिष्ठ अधिकारी उदय शिरोडकर यांनी बस निर्मिती प्रक्रियेचे सविस्तर विवेचन केले, ज्यात शेल लाइनपासून ते पेंट शॉप,सर्व ट्रिम लाइन स्टेजेस,शॉवर टेस्टिंग,गुणवत्ता क्लीअरन्स आणि अखेर चॅसिस यार्डमधील डिलीव्हरी विभागापर्यंतचे सर्व टप्पे समाविष्ट होते.आर्यन परब आणि दत्तराज देविदास यांनी आपापले अनुभव सांगितले आणि ए.सी.जी.एल.व्यवस्थापन,विशेषतः एचआर मॅनेजर मंदार गणपुले, प्लांट इंचार्ज श्री. जोशी आणि वरिष्ठ अधिकारी उदय शिरोडकर यांचे बस बांधणी प्रकल्पाबद्दल माहिती दिल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य उदय मांद्रेकर यांनी शैक्षणिक सहलीसाठी परवानगी दिल्याबद्दल व राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी संजय नाईक यांनी ही शैक्षणिक सहल आयोजित केल्याबद्दल त्यांचेही आभार आभार मानले. राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी संजय नाईक व शिक्षक कल्पेश भगत यांनी शैक्षणिक सहल आयोजित केली. विद्यालयाचे कर्मचारी रोहन पेडणेकर, शंकर फोंडेकर आणि अमित मुळगांवकर यांनी यावेळी सहकार्य केले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १७९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 179 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .